# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 74 / 2023 दिनांक :17.02.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**1)माळाकोळी :–** दिनांक 14.02.2023 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मौ. हाडोळी (ज) ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला थायरॉईडचा आजार आहे. तु नेहमी आजारी राहतेस, तुला कामधंदा होत नाही तुला मुल बाळ होत नाही तसेच तुझ्या माहेरहुन शेती घेण्यासाठी पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीचा शारीरीक व माणसीक छळ केला व दिनांक 14.02.2023 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास वरील कारणावरून आरोपी क्रमांक दोन व चार यांनी फिर्यादीचे हात पाय धरले आरोपी क्रमांक तीन हिने केस धरून फिर्यादीस जमीनीवर पाडले व आरोपी क्रमांक एक याने कोणतेतरी विषारी औषध बळजबरीने फिर्यादीचे तोंडात ओतुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी पल्लवी गणेश राहेरकर, वय 32 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. हाडोळी (ज) ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 20 / 2023 कलम 307, 498(अ), 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री डोके, मो.क्रं. 8652147575** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 12.02.2023 रोजी चे 10.00 वा. ते दि. 16.02.2023 चे 11.45 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी शाहुनगर वाघाळा नांदेड येथे**, यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे गेटचे व दरवाजाचे लॉक तोडुन आत प्रवेश करून कपाटाचे लॉकर तोडुन त्यात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने व नगदी 30,000 / –रूपये असे एकुण 74,400 / –रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सौ. भाग्यश्री भानुदास आंबटवाड, वय 38 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. शाहुनगर वाघाळा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 99 / 2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1749 भारती, मो.क्रं. 909627018701** हे करीत आहेत.

## 3)मोटार सायकल चोरी :–

**1)वजिराबाद :–**दिनांक 16.02.2023 रोजी चे 20.00 ते दि. 11.02.2023 चे 09.00 वा. चे दरम्यान, **एलआयसी ऑफिस आयुर्वेदीक कॉलेज समोर नांदेड येथे**, यातील फिर्यादीची हिरो होंडा कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26 / वाय–4697 किंमती 15,000 / –रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अमरदीप सदाशिवराव धर्माधिकारी, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. आयुर्वेदीक कॉलेज समोर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्ट वजिराबाद** गुरनं 48 / 2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1824 केंद्रे, मो.क्र. 9970381047** हे करीत आहे.

**2)किनवट :–**दिनांक 12.02.2023 रोजी चे 12.30 ते 13.00 वा. चे दरम्यान, **कलावती गार्डन जवळ किनवट ते माहुर रोडवर किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा त्याचे मित्रांचे लग्नाला कलावती गार्डन किनवट येथे गेला असता सुपर स्लेंडर कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26 / एझेड–1370 किंमती 15,000 / –रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सुरेश लक्ष्मण शेवटीवार, वय 47 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मार्कंडेयनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्ट किनवट** गुरनं 42 / 2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1052 कल्लाळे, मो.क्र. 7709711952** हे करीत आहे.

## 4)चोरी :–

**1)शिवाजीनगर :–**दिनांक 14.02.2023 रोजी 22.00 ते दि. 15.02.2023 चे 08.00 वा. चे दरम्यान, **महावितरण कंपणीचे ट्रान्सफॉर्मर तिरूपती फरशीचे दुकानासमोर नांदेड येथे**, यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने महावितरण कंपणीचे 315 केव्हीए ट्रान्सफॉर्मर मधील 450 लीटर ऑईल किंमती 9,000 / –रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी श्रीकांत बळीराम सोनटक्के, वय 57 वर्षे, व्यवसाय सहाय्यक अभियंता झोन–3 औदोगीक वसाहत शिवाजीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 47 / 2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2412 घुगे, मो.क्र. 8208438821** हे करीत आहेत.

**2)मुखेड :—**दिनांक 15.02.2023 रोजी 20.00 ते दि. 16.02.2023 चे 09.00 वा. चे दरम्यान, **जांब बु. ते कंधार हायवेरोड लगत असलेले अपेक्षा रसवंती सेंटर व हॉटेल मौ. जाबं ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची जांब बु. ते कंधार हायवे रोड लगत असलेले फिर्यादीचे अपेक्षा रसवंती सेंटर हॉटेल समोरील अशोका कंपणीची उसाची रस गाळण्याची मशीन व त्यावर लावलेली बदामी रंगाची मोटार एकुण किंमती 40,000/—रूपयाची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी संगमेश्वर बालाजी गौंड, वय 28 वर्षे, व्यवसाय रसवंती व शेती रा. जांब बु. ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 47/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गीते, मो.क्र. 8805957440** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**1)नांदेड ग्रामीण :—**दिनांक 09.02.2023 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतामध्ये कांकाडी ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतामध्ये फिर्यादीच्या नवऱ्याला पाईप काढण्याच्या कारणावरून मारहाण केल्याने फिर्यादीने माझे नवऱ्याला का मारला असे विचारण्यास गेली असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून थापडबुक्यानी मारहाण केली व विजय बिंगेवाड यांने फिर्यादीचे डाव्या हातावर चावा घेवुन काठीने उजव्या बरगडीवर मारल्याने हाड मोडले आहे. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी तारामती सुखदेव बिंगेवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कांकाडी ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 101/2023 कलम 325, 324, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2121 पांचाळ, मो. नं. 9011079556** हे करीत आहेत.

**2)भोकर :—**दिनांक 15.02.2023 रोजी चे 16.45 वा. चे सुमारास, **मौ. नांदा (खु) ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे मुलास का मारहाण केली असे आरोपीस विचारणा केली असता यातील नमुद आरोपीने हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यात मारून गंभीर जखमी केले तसेच फिर्यादीचा मुलगा कृष्णा यास शेतात गळा धरून मानेवर मारहाण केली व शिवीगाळ करून पुन्हा माझ्या वाटेला आलास तर जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी भुजंगराव पी. दत्तराव मांजरे, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. नांदा (खु.) ता. भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 54/2023 कलम 326, 323, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कराड, मो. नं. 9823714385** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :—

**1)नांदेड ग्रामीण :— 27.10.2022** ते दि. 03.01.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी गोपाळचावडी ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईचे चारीत्र्यावर संशय घेवुन ड्रायव्हींग स्कुल टाकण्यासाठी तुझ्या माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून थापडबुक्याने मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 100/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा असुन **तपास** पोहेकॉ/**1749 श्री भारती, मो.क्रं. 909627018701** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :— 23.04.2023** चे 00.00 ते दि. 16.02.2023 चे 00.00 चे दरम्यान, **मौ. धानोरा ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत फिर्यादी बाईस तु माहेरहुन लग्नात काहीच आणले नाहीस, हुंडा दिला नाही, तु आम्हाला माहेरात गेल्यास कांही मानपान देत नाहीस, तु दिसायला चांगली नाहीस, तुला नांदायचे असेल तर तुझ्या माहेरहुन धंदयासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण केली व सतत शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 45 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 45/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा असुन **तपास सपोउपनि/श्री घुगे, मो.क्रं. 9822720567** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :—

**1)विमानतळ :—** दिनांक 26.12.2020 रोजी चे 13.33 वा. चे सुमारास, **जिल्हा जात पडताळणी समिति कार्यालय नमस्कार चौकाच्या जवळ नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून बनावट व खोटे मृत्यु प्रमाणपत्र, शिधापत्रीका, पिंजारी जात प्रमाणपत्र, बनावट ओळख प्रमाणपत्र, बनावट रहीवाशी प्रमाणपत्र, बनावट जन्म मृत्यु, अनुउपलब्धता प्रमाणपत्र तयार करून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समीती समक्ष प्रस्ताव सादर करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करणे करीता समीतीची दिशाभुल व फसवणुक केली आहे. वगैरे **फिर्यादी मपोनि/सुनिता मनाजी शिंदे, दक्षता पथक जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिति नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 57/2023 कलम 420, 465, 468, 471, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जाधव, मो.नं. 8007580146** हे करीत आहेत.

## 8)जुगार :—

**1)कुंटूर :—** दिनांक 16.02.2013 रोजी 16.45 वा. चे सुमारास, मौ. चारवाडी **जाणारे रोडलगत कोकलेगाव शिवारात हनीफ शेख यांचे शेतात ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 11,000/—रुपये व तीन मो सा ची किंमत अंदाजे 1,95,000/—रूपयाच्या असा एकुण 2,06,000/—रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/विवेक विठ्ठलराव ईश्वरे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 28/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2472 साहेबराव गिते, मो.क्रं. 9158272932** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :—** दिनांक 16.02.2013 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **मौ. कामठा फाटा बंद घरात ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सोळा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी रूपये, एक मो सा, सात मोबाईल, दोन टेबल, दहा खुर्च्या, टेबल बोर्ड, व जुगाराचे साहित्य असा एकुण 44,400/—रुपयाचा मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/दशरथ गोंदराव तलेदवार, ने. वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड ग्रामीण कार्यालय नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 43/2023 कलम 4, 5 म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2803 चाटे, मो.क्रं. 9673311588** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 75 / 2023 दिनांक :17.02.2023**

### सावधान! फेसबुक वरील अनोळखी व्यक्तीची मैत्री पडेल महागात...

फेसबूकवर अनेकवेळा आपण आपले फ्रेंड सर्च करतोत तसेच आपल्या मित्राचे फेसबुकवरील मित्राला सुद्या आपण फ्रेंड बनवतो व आपले फेसबुक वरील फ्रेंड लिस्ट वाढवण्याचा प्रयत्न करतो. बऱ्याच वेळा आपण ज्या व्यक्तीला कधीही प्रत्यक्षात भेटलेले नसतो परंतु ते आपले फेसबुकवर मित्र असतात. पण एखादया वेळेस आपला फेसबुकवरील फ्रेंड आपल्याला आडचणीत आणु शकतो. फेबसबुकवर आपल्याला एखादया अनोळखी व्यक्तीची (स्त्री किंवा पुरूष)चांगले प्रोफाईल फोटो असलेले फ्रेंड रिक्वेस्ट येते, व आपल्याशी मैत्री करण्याची मागणी करतो/करते, व आपल्याला चॅटींग करून व्हिडीओ कॉलवर बोलण्याची मागणी करून आपण व्हिडीओ कॉल केल्यास/ उचलल्यास आपला व्हिडीओ समोरून रेकॉर्ड केला जातो व आपल्या चेहऱ्या सोबत मॉर्फींग करून आपण नग्न स्थितीत व्हिडीओ पाठवून आपली ब्लॅकमेलिंग करून पैशाची मागणी केली जाते.

नांदेड येथील प्रतिभा निकेतन महाविदयालयात साबर गुन्हे आणि सुरक्षा या विषावर नुकतिच जनजागृती कार्यक्रम पार पडला यावेळी प्राचार्य डॉ.डि.के.स्वामी, सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एन.डी.उबाळे, पोलीस उपनिरीक्षक जी. बी.दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी सायबर गुन्हे आणि जनजागृतीच्या अनुषंगाने माहिती देतांना पोलीस उप निरीक्षक जि. व्ही. दळवी यांनी मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना मोबाईलच्या वापरामुळे होणाऱ्या दुष्परीणामा बाबत माहिती दिली. मोबाईलच्या वापरामुळे 1)अपघात होवु शकतो 2)शारिरीक व्याधी होवु शकातात 3)कुटूंबात कलह निर्माण होवु शकतो 4)माणसीक त्रास होवु शकतो 5)जिवनात नैराश्य येऊ शकते.

सोशल मिडीया व ऑनलाईन बँकीग फसवणुक टाळण्यासाठी त्यांनी मार्गर्शन केले की, सोशल मिडीया व बँकीग ॲप्लकेशला मजबुत पासवर्ड ठेवावेत. सदर पासवर्ड नेहमी बदलावेत, आपले सोशल मिडीयाचे प्रोफाईल लॉक करावे, त्याची टु स्टेप व्हेरीफिकेशन करून ठेवावेत, व प्रायव्हसी आणि सेटींग मध्ये जाऊन आपली सुरक्षीत सेटींग करून ठेवावी, तसेच ऑनलाईन व्यवहार करतांना कोणत्याही अनोळखी व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे ओटीपी देवु नये. अनोळखी व्यक्तीने सांगीतलेले कोणतेही ॲप आपले मोबाईल मध्ये इंस्टॉल करू नये, अनोळखी व्यक्तीने पाठवलेला कोणताही क्युआर कोड स्कॅन करू नये, अनोळखी व्यक्तीने पाठविलेल्या कोणत्याही लिंकवर क्लिक करू नये व त्या मध्ये आपली वैयक्तीक व बँक खात्याची माहिती भरू नये, सायबर गुन्हयाचे प्रकार व त्यावरील उपाय योजना यांच्या आधीक माहिती साठी नांदेड पोलीस फेसबुक पेजला भेट देण्याचे आव्हान केले.

तसेच **इंटरनेटच्या माध्यमाद्वारे कोणत्याही स्त्रिचा चोरून पाठलाग करणे हा भादवि 354 ड नुसार गुन्हा आहे. सायबर गुन्हया संबदर्भात तक्रार असल्यास नॅशनल सायबर क्राईम 1930 या क्रमांकावर माहिती देता येते. तसेच नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टीग पोर्टलवर तक्रार नागरीकांना देता येते.**

तसचे अपात्कालीन परिस्थीतीत पोलीसांची तात्काळ मदत हवी असल्यास किंवा एखांदया घटनेची माहिती पोलीसांना दयावयाची असल्यास डायल 112 सर क्रमांकावर फोन करावे. असे आव्हान त्यांनी केले. या वेळी डॉ. स्वाती तांडे यांनी प्रास्तावीक केले. व दिपक वाघमारे यांनी आभार मानले.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 76 / 2023 दिनांक :17.02.2023

दिनांक 16.02.2023 चे 23.00 ते दि. 17.02.2023 चे 05.00 चे दरम्यान **संकेत वसंतराव दिघे,** सपोनि पोस्टे रामतिर्थ यांची धर्माबाद व बिलोली उपविभागामध्ये स्टॉपसह रात्रगस्त डयटी होती. नरसी ते बिलोली रोडवर गस्त करीत असतांना नर्सी शासकीय विश्राम ग्रहासमोर एक हिरव्या रंगाची स्कॉर्पीओ हळुहळु जातांना दिसली. त्यामध्ये पाच ते सहा व्यक्ती तोंडाला बांधुन ओळख लपवल्यासारखे दिसल्याने व सदर गाडीचा संशय आल्याने सपोनि संकेत दिघे, यांनी त्यांना आडवण्याचा प्रयत्न करीत असतांना बिलोलीच्या दिशेने भरधाव वेगाने निघुन गेली. त्यांचा संशय जास्त बळावल्याने बिलोली येथे नाकाबंदी लावण्यासाठी वायरलेस वरून माहिती देण्यात आली. त्यांना कट मारून बॅरीकेटला धडक देवुन कोंडलवाडीच्या दिशेने भरधाव वेगात निघुन गेली. थोडया वेळानंतर कोंडलवाडी वरून वायरलेस वर माहिती मिळाली की, वायरलेसवर सांगीतलेली हिरव्या रंगाची स्कॉर्पीओ परत बिलोलीकडे येत आहे. असी माहिती मिळाली. आम्ही सुध्दा बिलोली मध्ये पोहंचलो.

दिनांक 17.02.2023 रोजी 01.45 वा. चे दरम्यान बिलोली ते कोंडलवाडी रोडवर न्यु रमेश मेडीकल समोर बिलोली पिटर मोबाईल स्टॉपसह, व आम्ही पिटर मोबाईलसह नाकाबंदीसाठी उभा राहीलो. तेवढयात सदर स्कॉर्पीओ चालकाने भरधाव वेगात स्कॉर्पीओ घेवुन येवुन आम्हाला व नाकाबंदीवर असलेली पोलीस अधिकारी व अंमलदार यांना जिवे मारण्याच्या उदेशाने अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. तेव्हा प्रसंगावधान राखुन पोलीस अंमलदार बाजुला सरकले.

आमची गाडी बाजुला घेतली तेवढयात तेथे असलेली कोंडलवाडी पिटर मोबाईलला धडक देवुन नुकसान केले. व अंमलदारांचे अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला. ते बाजुला सरकले असता शासकीय मो सा वरून गाडी घालुन सदर गाडीचे नुकसान करून स्कॉर्पीओ पुढे घेवुन गेले. आम्ही प्रसंगावधान राखुन वाहन चालकांस नियंत्रीत करण्यासाठी आमच्या सर्व्हीस रिव्हॉलर मधुन आमचा जिव वाचविण्या करीता एक राऊंड फायर केला. तिथुन सदर स्कॉर्पीओ निघुन जाण्याचा प्रयत्न करीत असतांना थोडया अंतरावर जावुन खडयात आडकली. अंधाराचा फायदा घेवुन गाडी मधील संशयीत पळुन जात असतांना इलीयाज बाबु कुरेशी, रा. बाजारपेठ कल्याण जि. ठाणे यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांने सांगीतले की, स्कॉर्पीओ गाडी क्रमांक एमएच–04 / बीक्यु–2479 ही सोहेल पटेल, रा. नांदेड यांची गाडी असुन सोबत 1)फिरोज जबरा, रा. भिंवडी जि. ठाणे 2)कयुम भटीआली, रा. मुंब्रा जि. ठाणे 3)इजाज कुरेशी, होल रा. भिवंडी जि. ठाणे 4)ताहेर कुरेशी, रा. नांदेड आणखीन एक इसम नाव माहित नाही आम्हालां गुरे चोरून आणण्यास सांगीतले होते. त्याच्या सांगण्यावरून ड्रायव्हर इजाज कुरेशी, रा. भिंवडी हा वाहन चालवत होता.

तरी वरील इसम दरोडा, जबरी चोरी किंवा इतर गंभरी स्वरूपाचा दखपात्र गुन्हा करण्याच्या उदेशाने जात असतांना त्यांना आडवण्याचा प्रयत्न केला असता पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार योना जिवे मारण्याच्या उदेशाने अंगावर गाडी घालुन पळुन जात असतांना सदरचे वाहन खडयात आडकल्याने वाहानातील संशयीत पळुन जात असतांना त्यातील एका व्यक्तीस पकडुन वाहानांची तपासणी केली असता त्यांच्या वाहनामध्ये दोरी, लाकडी दांडके, लोखंडी पाईप, व लोखंडी तलवार मिळुन आले. त्यांच्यावर पोस्टे बिलोली येथे अपराध क्रमांक 19 / 2023 कलम 307, 353, 279, 427, भादवि व सह कलम 4 / 25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन पुढील तपास **श्री राम केंद्रे,** सपोनि पोस्टे बिलोली हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री आबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. विक्रांत गायकवाड**, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग धर्माबाद यांचे मार्गदर्शनाखाली **श्री संकेत दिघे**, सपोनि, पोकॉ बोडके, रिंधकवाले, पोस्टे रामतिर्थ, आणि संतुका इबीदार, पिटलेवाड पोस्टे बिलोली यांनी केली आहे. तात्काळ मा. पोलीस अधिक्षक साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद यांनी घटनास्थळाला भेट दिली.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 77/2023 दिनांक :17.02.2023

**आगामी महाशिवरात्री व शिवजयंती शांततेत पार पाडणे बाबत....**

नांदेड जिल्हयामध्ये दिनांक 18 फेब्रुवारी, 2023 रोजी महाशिवरात्री, 19 फेब्रुवारी, 2023 मोठया प्रमाणात साजरी करण्यात येणार असुन जनतेने, शांततेत सण उत्सवाचा आनंद घ्यावा. सदर कार्यक्रमामध्ये कोणीही, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, जनतेला रस्त्याने चालतांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच काढण्यात येणाऱ्या मिरवणुका मध्ये मा. कोर्टानी दिलेल्या ध्वनीक्षेपकांचे पालन करावे. ध्वनीक्षेपाच्या अनुषंगाने मा. कोर्टानी दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. शिवजयंतीच्या अनुषंगाने कर्कश आवाज करणारे कोणतेही वाद्य वाजवुन नियमांचे उल्लंघ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच तरूण मुलानी उत्साहाच्या भरात शहरात आणि जिल्हयात दोन चाकी, चार चाकी, वाहनांवरून वर हुल्लडबाजी करणे, बुलेटचे सायलेन्सरवर आवज करणे, वाहनांची नंबर प्लेट काढणे, स्टंटबाजी करणे, सामान्य जनतेस त्रास होईल असे रस्त्यावर ग्रुपने फिरून आवाज करणे असे कृत्य करू नये. असे नियमाचे उल्लंघन केल्यास त्यांचेवर पोलीसांकडुन कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल असे **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री आबिनेश कुमार**, . मा. श्री **डॉ खंडेराय धरणे**, यांनी जनतेला आवाहन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड